Vol III Issue X April 2014 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-10 | April-2014
Available online at www.aygrt.isrj.net

# कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास

**शोभा महारु चौधरी**

सहाय्यक प्राध्यापक , धुळे एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे.

**सारांश :-**

प्रस्तुत संशोधनात धुळे तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेण्यात आलेला आहे. त्यासाठी 179 विद्यार्थ्यांची सरल यादृच्छिक पद्धतीने नमुना निवड करण्यात आली. माहिती संकलनासाठी डॉ. आभाराणी बिस्त यांच्या प्रमाणित स्वसंकल्पना ताण चाचणीचा वापर करण्यात आला. तसेच शैक्षणिक संपादणूक पाहण्यासाठी विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षेतील गुण संकलित करण्यात आले.पिअरसनच्या परिघात परिगुणन पद्धतीने स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक या दोन चलांमधील सहसंबंध काढण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या संपूर्ण गटातील विद्यार्थी, मुले, कला व विज्ञान शाखेचे विद्यार्थी, ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यात ऋण सहसंबंध असून तो 0.05 स्तरावर सार्थक नाही असे आढळून आले. तसेच मुलींचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यात धन सहसंबंध असून तो 0.05 स्तरावर सार्थक नाही असे आढळून आले.

## प्रस्तावना :

स्वतःबद्दल व्यक्तीच्या मनात असणारी जाणीव आणि स्वतः बद्दलची प्रतिमा म्हणजे स्वसंकल्पना होय. स्वतःची शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक वैशिष्ट्ये, आकांक्षा, संपादन इ. बद्दलच्या व्यक्तीच्या समजुतींचा यात समावेश होतो. आपली स्वसंकल्पना आपणास आपण कोण आहोत याची ओळख करुन देते. आपल्या भोवतालच्या व्यक्ती आणि परिस्थिती जरी बदलत असल्या तरी आपली स्वसंकल्पना आपणास जाणीव करुन देत असते की, तुम्ही काल जसे होता तसेच आहात. आपली स्वप्रतिमा ही आपल्या शरीरापेक्षा ही जास्त खरी असते. तसेच तिच्या नियंत्रणाच्या मार्गामुळेच आपणास आपल्या शरीराचे अनुभव येत असतात. आपणास स्वओळखीची जाणीव होणे इतके महत्वाचे असते की, एखाद्याची किंवा एखाद्या गोष्टीची भीती वाटत असेल तर त्या गोष्टीचा त्यामुळे प्रतिकार करता येतो. थोडक्यात व्यक्तीची स्वतःच्या विविध शारीरिक अवयवाप्रती असलेली अभिवृत्ती, मानसिक क्षमतांबाबत असलेला आत्मविश्वास आणि स्वतःच्या स्वभाव गुण वैशिष्ट्यासंबंधी असलेले व्यक्तीचे मत ह्यांच्या आधारे व्यक्तीची स्व–संकल्पना निर्माण होत असते.

कुमारावस्थेत मुलांचा 'स्व' विकसित होतो. त्यांच्या स्वसंकल्पना चांगल्या विकसित होतात. परंतु ज्यावेळी पालक, शिक्षक व मित्र यांच्याकडून त्यांच्या स्वसंकल्पनांना धक्का पोहोचतो. त्यावेळी त्यांना स्वसंकल्पना ताण येतो. या स्वसंकल्पना ताणाचा मुलांच्या शैक्षणिक संपादणूकीवर परीणाम होतो का ? याचा शोध प्रस्तुत संशोधनात घेण्यात आलेला आहे.

## संशोधनाची गरज :

कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी ची मुले ही साधारणतः कुमारावस्थेतील असतात. या अवस्थेत स्वतःचे मत मांडण्यात अभिमान वाटतो. जुन्या व नव्या पिढीतील संघर्ष या अवस्थेमध्ये सुरु होतो. आपण स्वतंत्रपणे वागावे असे जरी त्यांना वाटले तरी आईवडीलांचे संरक्षण व प्रेम यासाठीही ही मुले भुकेलेली असतात. मात्र आईवडील त्यांच्या इच्छा आपल्यावर लादतात असे त्यांना वाटते. या संघर्षामधूनच एखादे वेळी ही मुले बंडखोर वृत्ती प्रकट करतात. इयत्ता 5 वी ते 7 वी पर्यंत शिक्षकांना दैवत मानण्याची या मुलांची वृत्ती इयत्ता 10 वी, 11 वी त आल्यावर एकदम बदलते. शाळा व शिक्षक याबद्दल ते नाराजी व्यक्त करतात. मुलांच्या स्वसंकल्पनावर परिणाम करणारे सर्वात महत्वाचे घटक म्हणजे पालक, शिक्षक व समवयस्क मित्र. पालक जर नेहमीच आपल्या मुलाची हेटाळणी करत असतील, शेजारच्या मुलाशी तुलना करत असतील, अवास्तव अपेक्षा करत असतील अशा मुलांच्या स्वसंकल्पनावर विपरित परिणाम होतो. तसेच शाळेत शिक्षक देखील त्यांच्या मतांचा आदर करत नसतील, वर्गात सर्वांसमोर त्यांची कानउघाडणी करत असतील तर मुलांची स्वप्रतिमा हिणकस

बनते. समवयस्क मित्रांच्या वागण्याचाही परिणाम मुलाच्या स्वसंकल्पनेवर होतो. शारीरिक व्यंग, दुबळेपणा यामुळे जर मित्रांच्या कृतीत सहभागी होता येत नसेल तर मित्र चिडवतात, टाळतात. या हेटाळणीचा विपरित परिणाम स्वप्रतिमेवर होतो. याउलट काही मुलांमध्ये विशेष,क्षमता,कौशल्ये असतील तर त्याचे मित्र त्याला गटात स्थान देतात, पुढाकाराची संधी देतात, त्याचे कौतुक करतात. यातून त्याची स्वप्रतिमा उंचावते. पालक व शिक्षक त्यांनी देखील त्यांच्याकडून वास्तव अपेक्षा ठेऊन त्यांना वेळोवेळी प्रेरणा देऊन त्यांच्या गुणांचे कौतुक केले तर त्यांचा आत्मविश्वास वाढतो. तसेच स्वसंकल्पना ही उंचावते.

कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी ची मुले विभिन्न कौटुंबिक व शालेय पार्श्वभूमीतून आलेली असतात. त्यामुळे पालक, शिक्षक व समवयस्कांकडून त्यांना चांगलेच अनुभव येतील असे नाही. काही वेळा विपरित अनुभवांचा परिणाम त्यांच्या स्वसंकल्पनांवर होतो. त्यामुळे या मुलांना स्वसंकल्पना ताण येतो व त्याचा परिणाम त्यांच्या शैक्षणिक संपादणूकीवर होतो. या संशोधन अभ्यासामुळे पालक व शिक्षक यांना मुलांच्या स्वसंकल्पना ताणाची माहिती होईल व ते त्याचा हा ताण कमी करण्यासाठी योग्य उपाययोजना करु शकतील. तसेच या ताणामुळे जर विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक कमी होत असेल तर ती कशी वाढेल याचा ही प्रयत्न ते करतील. म्हणून हे संशोधन महत्त्वाचे आहे. तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यात सहसंबंध आहे का? तो कोणत्या प्रकारचा आहे ? तसेच या सहसंबंधाच्या बाबतीत लिंग, शाखा व क्षेत्र या घटकांनुसार वेगळेपण जाणवते का? या प्रश्नांच्या समाधानकारक उत्तरासाठी या संशोधन अभ्यासाची गरज आहे.

### उद्दिष्टे :

1) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
2) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या मुलांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
3) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या मुलींचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
4) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या कला शाखेच्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
5) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
6) ग्रामीण भागातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
7) शहरी भागातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.

### परिकल्पना :

1) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
2) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या मुलांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
3) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या मुलींचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
4) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या कला शाखेच्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
5) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
6) ग्रामीण भागातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
7) शहरी भागातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.

### न्यादर्श :

या अभ्यासासाठी धुळे जिल्ह्यातील तीन ग्रामीण व तीन शहरी कनिष्ठ महाविद्यालयातील 179 विद्यार्थ्यांची सरल यादृच्छिक पद्धतीने न्यादर्श म्हणून निवड केली.

### संशोधन साधने :

या संशोधन अभ्यासासाठी डॉ. आभाराणी बिस्त यांनी प्रमाणित केलेल्या स्वसंकल्पना ताण चाचणीचा वापर करण्यात आला. या चाचणीत एकूण 56 विधाने आहेत. प्रत्येक विधानासमोर नेहमी, ब—याच वेळा, कधी कधी, क्वचित, कधी ही नाही असे पाच पर्याय दिलेले आहेत. या चाचणीतील 49 विधाने होकारार्थी असून 7 विधाने नकारार्थी आहेत. त्यांचे गुणदान पुढीलप्रमाणे करण्यात आले.

| विधाने | नेहमी | ब–याच वेळा | कधी कधी | क्वचित | कधीही नाही |
|---|---|---|---|---|---|
| होकारार्थी | 0 | 1 | 2 | 3 | 4 |
| नकारार्थी | 4 | 3 | 2 | 1 | 0 |

या चाचणीचा विश्वसनीयता गुणांक 0.83 असून चाचणीत अंतर्गत रचनात्मक सप्रमाणता आहे. ही चाचणी मूळ हिंदीत असून तिचे मराठीत भाषांतर करण्यात आलेले आहे.

तसेच विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक पाहण्यासाठी त्यांचे वार्षिक परीक्षेतील गुण संकलित करण्यात आले.

*कार्यपद्धती :*

या संशोधन अभ्यासासाठी संशोधकाने सर्वेक्षण पद्धती वापरलेली आहे. न्यादर्शाला आवश्यक त्या सूचना देऊन स्वसंकल्पना चाचणीच्या आधारे माहिती संकलित करण्यात आली. मॅन्युअलनुसार चाचणीचे गुणदान करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक पाहण्यासाठी त्यांचे वार्षिक परीक्षेचे गुण संकलित करण्यात आले. न्यादर्शाचे संपूर्ण गट, मुले व मुली, कला शाखा व विज्ञान शाखा तसेच ग्रामीण व शहरी कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी असे सात गट तयार करण्यात आले.

***संख्याशास्त्रीय तंत्र :*** या संशोधन अभ्यासात संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पिअरसरनच्या परिघात परिगुणन पद्धतीने स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक या चलांमधील परस्पर सहसंबंध (त) काढण्यात आला.

***संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :*** खालील कोष्टकाच्या आधारे केलेले आहे.

***कोष्टक क्रं.1***
***कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यातील सहसंबंध दर्शविणारी सांख्यिकी***

| गट क्र. | गटाचे नाव | एकूण विद्यार्थी | प्राप्त 'r' | स्वाधीनता मात्रा | सार्थकता स्तर | नमुना 'r' | प्राप्त 'r' व नमुना 'r' ची तुलना | 'r'ची सार्थकता | सांख्यिकी भुन्य परिकल्पना निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | संपुर्ण गट | 179 | –0.23 | 177 | 0.05 | 0.14 | –0.23< 0.14 | सार्थक नाही | स्वीकार |
| 2 | मुले | 92 | –0.29 | 90 | 0.05 | 0.21 | –0.29< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |
| 3 | मुली | 87 | 0.01 | 85 | 0.05 | 0.21 | 0.01< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |
| 4 | कला शाखा | 93 | –0.21 | 91 | 0.05 | 0.21 | –0.21< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |
| 5 | विज्ञान शाखा | 86 | –0.23 | 84 | 0.05 | 0.21 | –0.23< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |
| 6 | ग्रामीण | 87 | –0.11 | 85 | 0.05 | 0.21 | –0.11< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |
| 7 | शहरी | 92 | –0.27 | 90 | 0.05 | 0.21 | –0.27< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |

*निष्कर्ष :*

कोष्टक क्र.1 वरुन असे निदर्शनास येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या संपूर्ण गटातील विद्यार्थी, मुले, कला शाखा व विज्ञान शाखेचे विद्यार्थी , ग्रामीण व शहरी भागातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी चे विद्यार्थी यांचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक

संपादणूक यांच्यात ऋण सहसंबंध असून तो 0.05 स्तरावर सार्थक नाही म्हणून परिकल्पना क्र.1,2,4,5,6, व 7 यांचा स्वीकार करण्यात आला. तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या मुलींचा स्वसंकल्पना ताण व शैक्षणिक संपादणूक यांच्यात धन सहसंबंध असून तो 0.05 स्तरावर सार्थक नाही म्हणून परिकल्पना क्र.3 चा स्वीकार करण्यात आला.

***संदर्भग्रंथ सूची :***


1.Best John & Khan JAMES V. (2006), Research in Education. New Delhi; Prentice Hall of India Private Limited.

2.Mangal S.K. (November 2006), Statistics in Psychology & Education, New Delhi ; Prentice Hall of India Private Limited.

3.दांडेकर वा.ना., सहावी आवृत्ती, (सप्टेंबर 2000), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, पुणे : श्रीविद्या प्रकाशन.

4.नानकर प्रभाकर व सोहनी चित्रा, प्रथमावृत्ती, (एप्रिल 1997), शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे : नूतन प्रकाशन.

5.बर्वे बी.एन., प्रथमावृत्ती, (जुन 2010), जीवनमानाचे मानसशास्त्र, नागपूर : विद्या प्रकाशन.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net